# गीतं आणि भावगीतं

मो. ग. रांगणेकर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९७७.

REFBK-0007259
REFBK-0007259

• • रामकृष्ण बुक डेपो • •
मुंबई नं. ४

# गीतें आणि भावगीतें

मो. ग. रांगणेकर

REFBK-0007259
REFBK-0007259

मूल्य आठ आणे

रामकृष्ण बुक डेपो

सर्व हक्क श्री. मो. ग. रांगणेकर यांचेकडे आहेत.

प्रथमावृत्ती – ऑक्टोबर १९४९

मुद्रक : कृ. ना. सांपळे
रामकृष्ण प्रिंटींग प्रेस,
गिरगांव मुंबई नं. ४

प्रकाशक : वि. र. बाम
रामकृष्ण बुक-डेपो,
गिरगांव, मुंबई नं. ४

या गीतसंग्रहांतील गाणीं प्रसिद्ध करण्यांत माझ्या काव्यप्रतिभेनें वाचकांना दिपवून टाकण्याचा मुळींच हेतु नाहीं. कारण, एक तर यांत काव्य नाहीं, आणि प्रतिभा तर नाहींच नाहीं! असें असतां पुस्तकछपाईचा जो या महागाईच्या दिवसांत खटाटोप केला तो एवढ्यासाठींच, कीं माझीं गाणीं रेडियोंतून ज्या निरनिराळ्या गायकांकडून म्हटली जातात, त्यांना गाण्यांतील शब्द माहित असावे व ऐकणाऱ्या श्रोत्यांनाही ते नीट कळावे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हें दोघांनाही 'गाइड' आहे. एरव्ही, विनायक-केशवसुतांपासून तों कुसुमाग्रज–बोरकरांपर्यंत ज्यांच्या कलावती प्रतिभेनें कवितेचें उपवन फुलविलें, त्या उपवनांत माझ्यासारख्यानें मुसंडी मारून शिरण्याचा धसमुसळेपणा खचित केला नसता. (जसा मुक्तछंदाच्या नांवानें अलिकडे कांहीं कवि करीत आहेत!)

एक महत्त्वाची बाब मात्र या गीतसंग्रहाच्या निमित्तानें मी रसिकांपुढें ठेवूं इच्छितों. मासिकांत छापून येणाऱ्या कविता, नाटकांतील पदें, ग्रामोफोन रेकॉर्डस्‌करितां तयार होणारीं गाणीं, बोलपटांतील गाणीं आणि मैफलींत म्हटलीं जाणारीं गाणीं या सर्व जाति जरी कमीअधिक प्रमाणांत काव्यविभागांत मोडत असल्या, तरी या सर्व प्रकारांत सूक्ष्म भेद आहेत. मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या कवितांत अभिजात काव्याचे गुण असावयास पाहिजेत, ते कुणी ग्रामोफोन रेकॉर्डस् अगर बोलपटांतील प्रासंगिक गाण्यांत अपेक्षूं नयेत. मासिकांतील कविता ही सर्वस्वी वाच्य असते, तर इतर वरील सर्व प्रकारचीं गीतें श्राव्य असतात. मासिकांतील कवितांचे अर्थ, त्या अनेक वेळां वाचून समजून घेऊन त्याचा सावकाश आस्वाद घेतां येतो; पण बोलपटां-

तील गाणें त्या प्रसंगींच शब्दार्थासह समजून घेऊन कथानकांतील त्या वातावरणाशीं प्रेक्षकांना समरस व्हावयाचें असतें. नाटकांतील पदांतही ही गेयताच प्रामुख्यानें जास्त असते. त्यामुळें, मासिकांतील कवितांत केवढाही गूढ अर्थ व जडजंबाल शब्दरचना असली, तरी इतर सर्व प्रकारांत गेयतेलाच प्राधान्य असल्यामुळें सहज पचनी पडतील अशा कल्पना–व त्याहीपेक्षां त्या कल्पना कष्ट होऊं न देतां श्रोत्यांना कळाव्या अशी सोपी, सुलभ पण नादमधुर शब्द-रचना करणें गीतकाराला अवश्य साधलें पाहिजे. काव्यांत जो संगीताचा अंश असतो तो न जाणल्यामुळें कित्येक कवि आपल्या कवितांत पांडित्याचें प्रदर्शन करण्यासाठीं माधुर्याचा कडेलोट करतात; तेव्हां ह्या कवींना काव्योद्यानांतून खरोखरच हुसकून लाविलें पाहिजे. एवढ्यासाठींच, ज्यांत हा संगीताचा अंश नाहीं, अशी नादशून्य, पिसाट गद्यकाव्यें मुक्तछंदाच्या आश्रयाखालीं साहित्यांत धुमाकूळ घालीत आहेत, तीं रसिकांनीं ( इतरांनीं नव्हे ! ) बहिष्कृत केलीं पाहिजेत. ज्यांत गेयतेचा अंशही नाहीं तें काव्य नाहीं, एवढेंही या मुक्त छांदिष्टांना कां कळूं नये, हें मोठें गूढ आहे !

या संग्रहांतील कांहीं गाणीं माझ्या निरनिराळ्या नाटकांतून घेतलीं आहेत व इतर ग्रामोफोन रेकॉर्ड्स्साठीं केलेलीं आहेत. त्यापैकीं बरीचशीं लोकप्रिय झाल्याचें मला कळून आलें; म्हणूनच हा माल बाजारांत मांडण्याची कल्पना आली. साहित्यिक टीका-कारांनीं त्या वाटेस जाऊन आपलें हंसें करून घेऊं नये !

मॉडेल हाउस,
प्रॉक्टर रोड,
मुंबई ४

**मो. ग. रांगणेकर**

आणिन भूवरी नंदनवन रे । होशिल तूं जरि माझा ॥
पूजिन आणुनी माणिकमोती । होशिल तूं जरि माझा ॥
घेउनी येईन अमृत सारें । न्हाणिन तुजला राया ॥
गुंफिन माला नक्षत्रांची । होशिल तूं जरि माझा ॥ धृ० ॥

गुंगुनि माझ्या प्रेमगीतांनीं । गौरविते जग मजला ॥
होइल का रे सौख्य मनाला । जोंवरि तूं नच माझा ॥
मृत जगताला जीवन द्याया । आळविती जन मजला ॥
मीच कुणातें आळवूं आतां । होशिल तूं कधिं माझा ॥ १ ॥

ज्योत्स्ना भोळे
( "यंग इंडिया" )

गोकुळीं आली सकल संपदा । धेनुरूपें त्रिभुवनिंची या ॥
पावन झाली भूमि अहा ही । विमल चरणस्पर्शानीं या ॥धृ०॥

झरझर वर्षति अमृतधारा ।
गोहृदयांतुनी जीवन द्याया ।

सकल जगाची एकलि माता । काय उणें मग भालीं या ॥ १ ॥

**हिराबाई बडोदकर**
( "कोलंबिया" )

★

हा कोण मुशाफर आला । माझ्या दारीं ॥
पाहतो, हांसतो कैसा वेड्यापरी ॥
गुंफुनी फुलांच्या माला सांजसकाळीं ।
वाहतो रोज कां नकळे माझ्या पदीं ॥ धृ० ॥

चालतां पुढें मी, येई हा मागुनी ।
लावितो कपाळीं धूळ हातिं घेउनी ।
बघतां मी वळुनी हांसे आनंदुनी ।
ही पाहुनि त्याची मानसपूजा फुलते माझ्या उरीं ।
भावना नकळे कसली परी ॥ १ ॥

जाइना येथुनी भिक्षाही घेउनी ।
आणितो आंसवें थिजल्या या लोचनीं ।
दिनरात बापुडा बैसे कां अंगणीं ।
झांकुनि जरी मी माझ्या नयनां पडलें शय्येवरी ।
येतसे माझ्या स्वप्नीं तरी ॥ २ ॥

**केसरबाई बांदोडकर**
( " यंग इंडिया " )

★

अंतरिच्या खुणा माझ्या । ओळखसी एकला तूं ॥
धुंडिती हे नेत्र कोणा । ओळखसी एकला तूं ॥ धृ० ॥

थरथरती हे ओठ माझे । ओढतें पाऊल मागें ।
भरुनि कां ये ऊर माझा । ओळखसी एकला तूं ॥ १ ॥
ऐकतां चाहूल तुझी । मूक होई वाणी माझी ।
परि बोले मी किती मुखांनी । ओळखसी एकला तूं ॥ २ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
("यंग इंडिया")

★

सांभाळ ग, सांभाळ ग, सांभाळ
दौलत  लाखाची ग ॥ धृ० ॥

तुझ्या ज्वानिची कस्तुरी पाहुनि ग।
चहुं बाजुनीं येतील पारधि ग।
आणि मोहांत गुंतुनी फसाशिल ग।
तूं भोळी भाबडी हरिणी ग ॥ १ ॥

तुझ्या बनांत फुलतिल केवडे ग।
आणि गुंगुनि टाकिल सुगंध ग।
किती घालुनी विळखा बसतिल ग।
ठायीं ठायीं नाग लपलेले ग ॥ २ ॥

लोटिली नाव तुझी सागरीं ग।
जा पैलतिरीं तिज घेऊनि ग।
कुणि नाहीं तिथें तुज सोबती ग।
तुझी तूंच एकली नावाडी ग ॥ ३ ॥

**वत्सला कुमठेकर**
( " यंग इंडिया " )

★

सं. नं.
स्थळ प्रत

आली तुझ्या दारीं राधा ।
सोडुनी लाज रे सारी । मुरारी ॥ ध्रृ० ॥
हांसती, बोलती किती मज लागी ।
नाहीं मानिली खंत परी ॥ १ ॥
लावुनि मजला कलंक ऐसा ।
जाशिल कोठें सांग दुरी ॥ २ ॥
तूंचि विसावा मम जीवा या ।
राहिन एकली कोठवरी ॥ ६ ॥

**रोशनआरा बेगम**
( " यंग इंडिया " )

★

दिन मावळला । अजुनी नच येई कसा हरी हा ॥धृ०॥
किति काळ अशी । मज व्याकुळ रे करिसी सखया ॥
तुज आळवितां । नयनांत उभे बघ प्राण अतां ॥ १ ॥
तुज पाहुनि कुणि धांवली गोपि का ? ।
करपाशीं तुला बांधुनी ठेवि का ? ।
मग केविं तुला स्मरणार मनीं झुरते राधा ॥ २ ॥
मधु नाद तुझ्या वेणुचा ऐकण्या ।
प्रणयाकुल मुखचंद्रमा पाहण्या ।
जरि आतुर मी । भुलणार परीं नच या पुढतीं ॥ ३ ॥
परि धांवुनि दे दर्शना एकदा ।
कुरवाळुनी घे लाडकी राधिका ।
मग जा इथुनी । परि राहिल ती स्मृति अंतरिं या ॥४॥

ज्योत्स्ना भोळे
(" यंग इंडिया")

★

माझ्या मनीं, तुझ्या मनीं एकच लागे ओढ ।
परि व्हावी कशी रे सांग जिवाची जोड ॥
माझ्या मुखीं, तुझ्या मुखीं येती प्रीतिचे बोल ।
परि कोणी वदावें आधीं, हाच सवाल ॥ ध्रृ० ॥

मी सन्निध येतां जासी तूं दूर ना ।
दूरुनी परि टक लाविसी मज पाहण्या ।
कां उगा शिणविसी ऐसे तूं लोचना ।
किती काळ असा हा चालणार रे लपंडाव आपुला ॥
वाहुनी अंतरीं भिती अशी राजसा ॥ १ ॥

**सरस्वती राणे**
( "कोलंबिया" )

★

या फुलानों ! घेउनिया जा निरोपा ।
मधुगंधासवें आपुल्या ॥ धृ० ॥

थांब ना गे मेघमाले ! न्यावयातें ।
मम संदेश हा वल्लभा ॥
या, कुणी या थांबवाया निर्झरांना धांवतां ।
ना तरी जा चांदण्यानों ! बोलवाया वल्लभा ॥ १ ॥
येत नाहीं कोणी बाई । मीच माझी एकली ।
जा अतां गे स्वप्नराणी ! तूं तरी स्वप्नांतरीं ॥ २ ॥

केसरबाई बांदोडकर
(" यंग इंडिया ")

★

बोला अमृत बोला । शुभसमयाला
गोड गोड गोड ॥ धृ० ॥

दिपले पाहुनिया देवही हर्षभरें ।
ढाळुनिया सुमनें वदती । धन्य धन्य धन्य ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
(" यंग इंडिया ")

★

आला माझ्या दारीं ग । आकाशींचा चांद ॥

लाख दीप संगें घेउनी उजळाया अंधार ॥ धृ० ॥

शिंपडाया अंगणांत सडे अमृताचे ।

इंद्रदेव घेउनि आले कुंभ सुवर्णाचे ॥

आणुनी नक्षत्रें खालीं, घालिन मंगल रांगोळी ।

त्रिभुवनांत भाग्य न आलें ।

कुणाच्या ग भाळीं ॥ १ ॥

**मंगला रानडे**

( "हि. मा. व्हॉइस" )

★

मी वाहुं कुणा कुसुमांजली शून्य जगीं या ।
मी गाऊं कुणा सुरसंगीत घोर वनीं या ॥ घृ० ॥

तूं श्यामल का गौरमुखी असशील कैसा ।
चरण तुझे, वदन तुझें, पाहिन केव्हां ।
कधिं तुजला न्हाणिन रे लोचनिं माझ्या ॥ १ ॥

मी एकलीच अंध तुझ्या रम्य जगीं ना ।
होइन रे वेडि अतां वाट पाहतां ।
किती जन्म अशी शोधूं तुला घन तिमिरीं या ॥ २॥

**स्नेहप्रभा प्रधान**
("हि. मा. व्हॉइस")

★

हांसतां, खेळतां प्रेम सफल झालें ॥
विविधरूप संसारीं सौख्य नांदलें ।
हरुनिया आपदा जीवन सारें ।
रम्यमधुर झालें ॥ धृ० ॥

रुचिर भाव अंतरीं या ।
वसती का मनुजाच्या ।
हृदयींची संपदा अर्पियली का ही ।
सौख्य जरी न लाभे ॥ १ ॥

**ललिता परुळकर**
("कोलंबिया")

★

हंसहंसुनी गालीं कितीकदा ।
लावियलें वेड तूं ॥ धृ० ॥

गुणगुणुनी कानीं कितीकदा ।
लावियली ओढ तूं ॥

रुसरुसुनि उगिच कितीकदां ।
वाढविलें प्रेम तूं ॥
मज खचित बाई कळत ना ।
रीत तुझ्या प्रीतिची ॥ १ ॥

ज्योत्स्ना भोळे
( "यंग इंडिया" )

★

नदीकिनारीं । नदीकिनारीं । नदीकिनारीं ग ॥ धृ० ॥

इथेंच घडली भट आपुली ।
नवप्रेमाची पहिली वहिली ।
हांसत होत्या कुजबुजुनी या अवखळ लहरी ग ॥ १ ॥

तुझेच कुरळे केस मोकळे ।
सदा तयांशीं करुनी चाळे ।
वहात होता लबाड वारा । पदरामधुनी ग ॥ २ ॥

निळ्या नभांतुनि येउनी खालीं ।
ऐकत होती रात्र रुपेरी ।
निर्मलशा अपुल्या प्रीतीची । गोड कहाणी ग ॥ ३ ॥

निवांत झालें आज चहुंकडे ।
उभारलें प्रीतीचें थडगें ।
रात्र ढाळिते रोज प्रभातीं । अश्रुफुलें वरती ग ॥ ४ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( " यंग इंडिया " )

★

हांसोनि नाचोनिया आनंदें ।
जाऊं सखे ग वृंदावनातें ॥ धृ० ॥

पहा चालल्या ब्रिजललना या ।
भूषवावया श्याम कन्हय्या ।
गुंफुनि माला प्रेमाच्या या ॥ १ ॥

**इंदिरा वाडकर**
(“ यंग इंडिया ”)

★

कुठुनी बाई । आला नकळे जीवा ताप द्याया ॥
उमजलें न केव्हां गेलें हृदय भाळुनीया ॥ धृ० ॥

एकदांच झाली ना रे, भेट लोचनांची ।
आणि पेटली ही आग अंतरीं सदाची ।
एकदांच ये रे राया ! जिवा शांतवाया ॥ १ ॥

**वत्सला कुमठेकर**
( "यंग इंडिया" )

★

पाहते सदा देवा मी ।
गोजिरें रूप तुझें अंध जगीं माझ्या या ॥ धृ० ॥

हांसते, खेळते तुजसंगें ।
तूंच सखा माझा एकला ॥ १ ॥

मुकलें मी नेत्रसुखा । काय खेद मानूं उगा ।
पुरतिल का दोन नेत्र । पाहण्या विश्वरूप
तव देवा ॥ २ ॥

**स्नेहप्रभा प्रधान**

★

ये झणीं, ये रे, ये रे, ये रे माघारीं ।
क्षणभरि वळुनी, बघ मम नयनीं मूर्ति अपुली ॥ धृ० ॥

कुठवर एकली वाट पाहूं । तुजविण राहूं ।
विसरुनि जाशीलही नवथर प्रीत तुझी ।
जा घेउनिया संगतीं रे हें मन माझें ॥ १ ॥
तळमळले नयन तुझे जरि मजला कधीं पहाया ।
सुखविन तुजला । नकळत रे राया ।
येउनिया स्वप्नीं तुझ्या सखया ॥ २ ॥

ज्योत्स्ना भोळे
("हि. मा. व्हॉईस")

★

कटु बोल, परी तूं बोल रे ।
तुज आण माझी घननीळा ।। धृ० ।।
जरि गुंगुनिया रमलासी ।
किति गोपकुमारीपाशीं ।
वदणार नाहीं कटु बोल ।
तुज आण माझी घननीळा ।। १ ।।
तुज मीच एक जणुं प्यार ।
मनिं हीच आस उरणार ।
मग खेळ प्रीतीचे खेळ ।
नवलाख रोज घननीळा ।। २ ।।

वत्सला कुमठेकर
(" यंग इंडिया ")

★

१२५८

दर्यावर डोले माझं चिमुकलं घरकुल ।
घेउनिया पाठीवर जाई दूर गलबत ॥ धृ० ॥

किती दिस, किती राती ।
मोजल्या ग कोणी बाई ।
किति गांव, किती देस, ओलांडले ठावं नाहीं ॥ १ ॥

खालीं जळ, वरि आभाळ ।
दिसे समोर क्षितिज ।
असे किती जाती दिस माझ्या रायाच्या सोबत ॥ २ ॥

कधीं बाई खवळुनी ।
गरजतो समिंदर ।
बिलगते माझ्या राया सोडुनिया सारी लाज ॥ ३ ॥

पीठावाणी चांदण्यांत ।
फेकुनिया जाळं दूर ।
बैसतो ग राया गात आपुल्या पिर्तीचं गीत ॥ ४ ॥

कधीं बाई संपणार ।
कोण जाणें मुशाफरी ।
जाईना का जल्म जळीं, आहे राया माझ्यापाशीं ॥ ५ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( "हि. मा. व्हॉइस ")

हांसले, हांसले, सकल विश्व नाचलें ।
आनंदे वेडावुनी जीव धुंद जाहले ॥ धृ० ॥

फत्तर फुलले, अश्रु हांसले ।
बालरूप घेउनिया देव नाचले ।
ऐसें हें वैभव का कुबेरास लाभलें ? ॥ १ ॥

**अविनाश**
(" हि. मा. व्हॉइस ")

★

क्षण आला भाग्याचा । आला सौख्याचा ॥
हांसत मोदें, नाचत नादें हें मन माझें ॥ धृ० ॥

प्रेममया जीवनिं या । जरि राहिलें रंगुनिया ।
आला उदयाला, बहराला । मंगल दिन हा ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
(" यंग इंडिया ")

★

हा कोण गडे आला । मनमंदिरीं माझ्या ।
सुकुमार प्रेमकलिका ही अवचित फुलवाया ॥ धृ० ॥

गुणगुणुनि हृदयीं माझ्या ।
नवगीत प्रीतीचें हें ।
नकळे कुणी ग बाई, हा जीव पिसा केला ॥ १ ॥

फुलली खरिच का ही ।
अजि सृष्टिसुंदरीही ।
का भास असा होई नकळे उगाच हृदयीं ।
मिटतांही लोचनीं या ।
कुणि हांसतो कळेना ।
हुरहुर लावुनीया कां दूर असा गेला ॥ २ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( " हि. मा. व्हॉइस " )

★

अधरीं हांसतो हा कान्हा । बघुनि लाजली राधा ॥
भिरभिर किती नजर नाचते ही घननीळा ॥ धृ० ॥

वदनीं या अबोला । अधीर होउनी
वदती नयन हे तयाला ॥
थरथरते तनु माझी । सांवरी घननीळा ॥ १ ॥

**मंगला रानडे**

★

पांखरा । जा त्यजुनिया प्रेमळ, शीतल छाया ।
पसरलें विश्व अपार पहा ॥ धृ० ॥

भेदुनि गगनाला बघुनि ये देवलोक सारा ।
पिउनि अमृत, घेउनि संचित,
परतुनि ये घरा ॥ १ ॥

पु. ल. देशपांडे
(" कोलंबिया ")

★

बैसले मी पायथ्याशीं । तूं उभा शिखरावरी ।
वेडी कां रे जाहले मी । व्यर्थ ऐशी अंतरीं ।। धृ० ।।
केवढा तूं दिव्य तारा । शोभसी गगनांगणी ।
मी शिळा धरणीवरी या । कां उगा झुरते मनीं ।। १ ।।
दाटला अंधार येथें । राहुं कैसी एकली ।
फेंक रे किरणास एका । सोबती माझ्या जगीं ।।
आणिला किती वेग पायीं । यावया तुजपाशीं मी ।
भेट कैसी होइना रे । आपुली जन्मांतरीं ।। २ ।।

**ज्योत्स्ना भोळे**
(" यंग इंडिया ")

★

मी धुंडुनि धुंडुनी शिणलें ।
सुख हातीं नाहीं परि आलें ॥ धृ० ॥

भव्य, मनोहर प्रासादांतुनी ।
ऐश्वर्याच्या मोहक राशी ।
बघुनी माझे थकले डोळे ॥ १ ॥

संगीत, नर्तन स्वर्लोकीचें ।
दिव्य मनोरे सौंदर्याचे ।
बघुनि माझे दिपले डोळे ॥ २ ॥

हिंडुनि हिंडुनि रानोमाळीं ।
व्यर्थ धुंडिलें सौख्य मंदिरीं ।
स्थान सुखाचें एकच उरलें ।
शोधुनि पाहीन हृदयामधलें ॥ ३ ॥

**वत्सला कुमठेकर**
(“यंग इंडिया”)

★

रुसली राधा, रुसला माधव, रुसलें गोकुळ सारें ॥
कुंजवनीं लतिकाही रुसल्या तरुवर जणुं अनुरागें ॥ धृ० ॥

किती काळ असा धरुनि अबोला ।
रुसुनि बैसली मोहन–राधा ।
कोणी वदावें आधीं नकळे ॥
रुसलें गोकुळ सारें ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( "हि. मा. व्हॉइस" )

★

कुणी जा हो धुंडुनी आणा प्रिय अमुचा
श्याम कन्हय्या ॥ धृ० ॥

आजि चंद्र गगनीं कां विलसेना । रुसले
सारे बघ तारे ।
मिटल्या कलिका वनमाली ! जणुं जीवन
शून्य जहालें ॥
येईल केव्हां हंसवाया प्रिय अमुचा
श्याम कन्हय्या ॥ १ ॥
यमुनातिरीं फोडिती टाहो ।
" द्या आणुनि नंदकिशोर ! " ॥
धुंडुनिया ठायीं ठायीं हा एकच अंतरीं घोर ।
शिणल्या किती गोपी पहाया प्रिय अमुचा
श्याम कन्हय्या ॥ २ ॥

वत्सला कुमठेकर
(" यंग इंडिया ")

★

अजुनी कैसा येइना माझा रामराया।
घोर वनीं या हुरहुर वांया।
लाजविसी का रे गुणिराया ॥ धृ० ॥

पुष्पलतानो ! जा शोधाया।
घेउनिया हो राघवराया।
सोडिली का हो आजि माया ॥

**ज्योत्स्ना भोळे**
("यंग इंडिया")

★

नयनांत तुझ्या कसली जादू ।
तूं सांग गडे, मी काय वदूं ? ॥ धृ० ॥

पुससी मज तूं फिरफिरुनी कां ।
बघसी अशी तूं टक लाउनि कां ।
जरि येइन धीर करोनि वदूं ॥ १ ॥

किति कोमल तूं म्हणती तुजला ।
गमतो भय का परि हा मजला ।
थरथरती ओठ कसे उघडूं ॥ २ ॥

**गुलाबबाई**
( " यंग इंडिया " )

★

नको वळुन् बघूं माघारीं। जा रे खुशाल दर्यावरी ॥

तुझ्या नि माझ्या प्रीतीची रे संगती।
घेउन् शिदोरी आठवणीची।
जा रे खुशाल दर्यावरी ॥ धृ० ॥

तुझी लाडकी, उनाड होडी।
बघुन् समिंदर होईल वेडी।
आणि तयाला कवळायाला घेईल सारखी उडी।
त्या क्षणीं याद तुला येउन
माझी होशिल खिन्नमनीं ॥ १ ॥

नाहीं सोबती तुझ्या संगतीं।
एकटाच तूं दर्यावरती।
बघुन तुला रे येतील वरती रत्नं सुंदर किती ॥
त्यामध्यें नाहीं तुझी राणी पाहुनि
जाशील कळवळुनी ॥ २ ॥

तशीं खुळी तीं आभाळांतूनी।
नक्षत्रंही तुला हेरुनी।
डोळे मोडुनी, नाचुनि, चमकुनी येतिल खालीं जरी।
आठवेल रे झोंपडींतली मिणमिणती चांदणी॥ ३ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
("हि. मा. व्हॉइस")

गा, नवगीत गा । कोकिळे ॥
द्यावया मृतजना संजीवनी ॥ धृ० ॥

फुलतिल कणकण हे । ऐकुनी गीत तुझें ।
नवंतेजाची अमर ज्योति जगीं या उजळूं दे ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
("यंग इंडिया")

★

जरि रुसला चंद्रमा किती हा ।
लोटिल का कधीं निशा तयाला ।। धृ० ।।
रोज रोज चालला रुसुनिया ।
क्षीण करित कां अपुली काया ।
जाइल रुसवा मीलनकालीं ।
तीच सुखाची पौर्णिमा ।। १ ।।

**ज्योत्स्ना भोळे**
( " यंग इंडिया " )

★

- ३६ -

कैसें पाहूं रूप तुझें ।
दो लोचनांनी ॥
किति गाऊं गुण तुझे ।
एकव्या मुखानीं ॥ धृ० ॥
कुठें जोडूं कर हे माझे ।
प्रभो अंतराळीं ॥
जरि ओढ लागे जीवा ।
तुझ्या दर्शनाची ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( " यंग इंडिया " )

★

- ३७ -

तुजविणें जग सुनें झालें ग ।
किति करूं विनवणी आतां ग ॥ धृ० ॥
माझ्या मंदिरी चाले तुझं गुणगान ।
तुझ्या प्रीतीच्या माला गुंफून ॥
ढगाविण आभाळ, तशी माझी प्रीत ॥ १ ॥
माझ्या अंगणीं फुलली जाई ग ।
तुझ्या प्रेमजलाविण सुकली ग ।
देवाविना देऊळ जसें झालें शून्य ॥ २ ॥

**कृष्णराव चोणकर**
( " कोलंबिया " )

★

नीज माझ्या पाडसा !
झांकुनी घे शिंपल्या या मोतियाच्या राजसा ॥धृ०॥

पाहुनी हे दोन तारे ।
चंद्रमाही लाजला ॥
कोवळ्या या दंतमाला ।
वाहसी कोणा अतां ॥ १ ॥
विश्व सारें झोंपले रे । जागसी कां एकला ॥
लाविती ना देव सारे । दृष्ट माझ्या सोनुल्या ॥ २ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( " यंग इंडिया " )

★

- ३९ -

कैसा रुचला अबोला ।
तुजला वद रे मुकुंदा ॥ धृ० ॥

सोडुनि सकलां प्रिय सखि माझ्या ।
आलें दर्शन घ्याया ।
साहुनि हृदयीं कटु वचनांना ।
मग कां रुसला कान्हा ॥ १ ॥

**वत्सला कुमठेकर**
( " यंग इंडिया " )

★

- ४० -

हृदयांत माझिया तूं साउली ।
नयनांतली जणूं तूं बाहुली ॥ धृ० ॥

मनमंदिरीं सदा प्रतिमा तुझी पूजिली ।
परि आज ही अशी कां भंगली ॥ १ ॥

हृदयास घोर हा तूं लाउनी ।
परि जासी एकला कां सोडुनी ॥
सुखसागरीं खेळतां मम साद ही ऐकुनी ।
स्मरशील ना मला तूं थांबुनी ॥ २ ॥

**सरस्वती राणे**
" कोलंबिया "

★

– ४१ –

मनरमणा ! मधुसुदना ! मुखीं राहो माझ्या
प्रभो ! हें नाम सदा ॥ धृ० ॥

आठवितां रे गोकुळीच्या बाळलीला ।
आनंदें नटला जीव हा ॥
येइल का रे काळ ऐसा ।
द्याया सौख्य पुन्हा ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
( " यंग इंडिया " )

★

– ४२ –

ललना कुसुमकोमला ।
होइ अकारण हृदयीं व्याकुळ ।
साहिल कां कधीं ऐशा कृतीला ॥ धृ० ॥

जन्मजन्मांतरीं धरुनी ही आस अंतरीं ।
जीवन कटु हें मधुर मानिते ।
मातृहृदया ना तुला ॥ १ ॥

**पु. ल. देशपांडे**
( " कोलंबिया " )

★

छंद तुझा मजला कां मुकुंदा लावियला ।
अशी कशी रे मी भुललें सांग तुला ॥ धृ० ॥

संसारी माझ्या । येउनि कां ऐसा ।
केला घात पुरापुरा ।
कां असा रे घननीळा ॥ १ ॥

कशास झालें सासुरवासिण ।
उठतां बसतां तुझेंच चिंतन ।
कुणा म्हणूं रे मम स्वामी ।
नकळे मी ।
जोंवरी तूं मनिं माझ्या ॥ १ ॥

**ज्योत्स्ना भोळे**
(" हि. मा. व्हॉइस ")

★

भवसागरीं आधार शोधावयातें भ्रमसी कां रे ।
बघुनी हे मोहजाल ।
भुललें. मन कां सुखास ॥ धृ० ॥

जरि जन्मुनी होय नाश । रमतें मन कां सुखांत
सुखवी जीवा हा भास । भरली जगीं माया
भरली जगीं माया, मनुजा ! ॥ १ ॥

**हिराबाई बडोदेकर**
( "कोलंबिया" )

★

नाच हृदया आनंदें ।
मिरवित अपुलें भाग्य हें ।
शुभदिन मंगल हा । उधळित
आला । अमर सुखाला ॥ धृ० ॥

दशदिशा अहा ! फुलल्या ।
उडुनिया देवलोकीं । जाउनी
सांग सकलांना ॥

भाग्यवंत जरि आज कोण
मज ऐशी सांगा ।
त्रिभुवनीं देवा ॥ १ ॥

ज्योत्स्ना भोळे
( " हि. मा. व्हीईस " )

★

- ४६ -

गेली सुकुनी फुलवेल । बघ सखे ।
प्रेमजलाविण ही । हृदयिं गे ॥ धृ० ॥

सांग भुवनीं या नुरला कुणी का ।
हंसविल जो हृदया । अजुनिही ॥ १ ॥

**हिराबाई बडोदकर**
( " कोलंबिया " )

★

- ४७ -

नयनिं तव खेळे प्रतिमा माझी कां अशी ।
वदसी कटु वचना जरि मुखीं ॥ धृ० ॥

रुसुनिया सदा मीही तुजवरी ।
दूर लोटिते तुला दिनभरी ।
तळमळुनी परि नेत्र पाहती ।
येईल हांसत चंद्र कधीं । घेशिल तूं मज करपाशीं ॥१॥

**इंदिरा वाडकर**
( " यंग इंडिया " )

★

-४८-

कुटिल तुझी तऱ्हा किती बाई । कां ओढचि लागे
परि मज ही ॥ धृ० ॥

जासी निघोनी । मज पाहुनियाही ।
खचित खुळें कसें मन बाई । कां धांवचि घेई
तव पायीं ॥ १ ॥

तोडोनिया टाकियले । तव पाश मी कितीदां रे ॥
परि नाकळे कैसी ही तव मूर्ति । ये हांसत
स्वप्नीं मजपाशीं ॥ २ ॥

ज्योत्स्ना भोळे
( "यंग इं

★

REFBK-0007259
REFBK-0007259

-४९-

उभि कां गे नटुनि अशि दारीं ॥
नकळत गोड गोड हांससि तूं ॥
कां वद एकलि अशी गालीं ॥ धृ० ॥

धरुनि अधरिं अशी अंगुली सदा ॥
भिरभिर बघसी कोणा प्रियतमा ॥
रोज रोज अशी बाई ॥ १ ॥

इंदिरा वाडकर
( "यंग इंडिया" )

★